# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २७३ वा शनिवार दि.०६ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.





## लोकसभा निवडणुकीत जनतेच्या लोकन्यायालयात वेगळा निकाल लागेल याचा विश्वास –माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर / प्रतिनिधी :- लोकसभा निवडणूक सुरू झाल्या नंतर चित्र बदलत असून देशातील जनतेच्यालोकन्यायालयात लोकसभा निवडणुकीत वेगळा निकाल लागेल, असा विश्वास माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला. लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ गंगापूर याठिकाणी आयोजित सुसंवाद बैठकीत ते बोलत होते. लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी मतदार संघातील नागरिकांच्या भेटीला सुरुवात केली असुन मतदार संघात त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील गंगापूर येथे सतीश कानडे यांच्या निवासस्थानी सुसंवाद बैठक शुक्रवार दि. ५ एप्रिल रोजी सायंकाळी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या सुसंवाद बैठकीसाठी गंगापूर, चांडेश्वर, खोपेगाव, पेठ, कव्हा येथील ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुर लोकसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने गंगापूर या ठिकाणी आपण सुसंवाद बैठकीच्या रुपात एकत्र आलेलो आहोत. ७ मे रोजी होऊ घातलेल्या या निवडणुका देशासाठी अत्यंत महत्वाच्या आहेत. खऱ्या अर्थाने लोकशाही एखाद्या गावात असावी असे गंगापूर हे गाव असून या गावात आजतागायत सर्वधर्म समभाव टिकून आहे. समाजाची सेवा अगदी प्रामाणिकपणे करणारे नेतृत्व आणि काँग्रेस पक्षाचा कणा म्हणजे शिवअप्पा कानडे यांची आठवण नक्की येते. पूढे बोलतांना ते म्हणाले, कोविड काळात एकही जण घराबाहेर नसताना सामान्य माणसाला आवश्यक आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपल्याच महाविकास आघाडी सरकार प्रयत्न केले. पण आपल्या खासदारानी आपली साधी विचारणा केली नाही आणि असे लोक आता परत आपल्याकडे मत मागायला येत आहेत आणि हे मत मागण्याचा त्यांना अधिकार आहे का याचा विचार करावा. आज राज्याची व देशाची काय अवस्था आहे हे आपण पाहतोय शेतकऱ्यांना आंदोलन करण्याचे स्वातंत्र्य सरकारने दिले नाही, शेतीमालाला बाजारभाव दिला नाही, महागाई वाढवून ठेवली आणि जर सरकार असे वागणार असेल तर जनतेने जायचे कुठे असा प्रश्न निर्माण होतो. नुकतंच काँग्रेस पक्षाने जाहीरनामा प्रसिद्ध केला ज्यात रोजगार, महिला सक्षमीकरण, युवकांना बेरोजगार भत्ता, शिष्यवृत्ती यावर लक्ष केंद्रित केले आहे आणि म्हणूनच आपण सर्वांनी महाविकास आघाडीच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे असे त्यांनी आर्वजून सांगीतल पुढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, डॉ. शिवाजी काळगे यांच्या उमेदवारी बाबत जो आपल्यातील चैतन्य, उत्साह पाहून सर्वानाच एक विलक्षण ऊर्जा मिळते आहे. जेथे ते जातील तिथे मतदारांचा प्रतिसाद पाहता ते नक्की निवडून येतील असा विश्वास आहे. आपले विद्यमान खासदार जनतेला भेटत नाहीत पण डॉ. शिवजी काळगे निवडून आल्यानंतर जनतेसाठी प्रत्येक महिन्याला जनता दरबार घेऊन जनतेची कामे मार्गी लावतील यात शंका नाही. ऐन उन्हाळ्यात पाणी आरक्षित करण्याचे फर्मान काढले गेले आहे महाविकास आघाडी सरकार असते सरकारने मार्ग काढला असता पण विद्यमान सरकारने असे काही केले नाही. या सुसंवाद बैठकीत बोलताना महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, लोकसभा निवडणूक मतदार संघातील आपल्या उमेदवाराची आपणास ओळख व्हावी यासाठी मी आपल्या समोर या संवाद बैठकीच्या निमित्ताने आलो आहे. आपण सर्वांनी आपापसातील मतभेद विसरून आपल्याला या निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. हे करताना विद्यमान सरकारने मागील १० वर्षात केवळ जाहिरातबाजी, आश्वासने याच्या पलीकडे कांही केले नाही, याचा आपण सर्वांनी विचार करून या बाबी मतदारांच्या निदर्शनास आणून द्यावे. नुकतेच राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यात सत्तेत आल्यास जनतेसाठी काय करणार या गोष्टी सांगाव्या लागतील. आपण लातूरच्या सुसंस्कृत राजकीय वारसा अधिक बळकट करण्यासाठी प्रचंड मताधिक्याने मला निवडून द्यावे अशी विनंती केली. या सुसंवाद बैठकीचे प्रास्ताविक करताना दत्तात्रय बनसोडे म्हणाले की, आपल्या लातुर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले. यावेळी लातुर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष किरण जाधव, सुभाष घोडके, प्रवीण पाटील, माजी जिप अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे, जगदीश बावणे, निरीक्षक सर्जेराव मोरे, विजयकुमार साबदे, बिभीषण पाटील, डॉ.सतिश कानडे, तानाजी फुटाणे, सुधाकर पाटील (माकप), अण्णासाहेब पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार), सोनाली थोरमोटे, रमेश थोरमोटे, संजय निलेगावकर, समद पटेल, गणेश एस.आर. देशमुख यांच्यासह गंगापूर व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्वराज्य शक्ती सेना पक्ष्याच्या वतीने नौशाद शेख यांची धाराशिव येथुन लोकसभेसाठी उमेदवारी जाहीर

### पत्रकारिता, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्यात उल्लेखनीय योगदान



धाराशिव : स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ.करुणा धनंजय मुंडे यांनी शेख यांचा समाजसेवेतील योगदान पाहुन व धाराशिव येथे चांगला जनसंपर्क, पत्रकारितेतील अनुभव, सामाजिक चळवळीतील लढा, वारंवार समाजातील ज्वलंत प्रश्नांना आजचा फोडण्याचे व न्याय मिळवून देण्याचे केलेले सतत प्रयत्न ही त्यांची जमेची बाजू आहे. नौशाद शेख हे मुळचे उमरगा तालुक्यातील केसरजवळगा या गावचे रहिवासी आहेत. दैनिक जयहिंद महाराष्ट्र या वृत्तपत्रांचे ते संपादक आहेत. अशी त्यांची ओळख आहे. सतत समाज सेवेत सक्रियपणे पुढाकार घेऊन समाजबांधवांच्या हितासाठी लढत असतात.या वेळी आमच्याशी बोलताना उमेदवार नौशाद शेख यांनी सांगितले पक्षाने जो विश्वास माझ्यावर दाखवून मला उमेदवार जाहीर केले आहे.ते मी पुर्णपणे जवाबदारीने कामाला लागेल व धाराशिव जिल्ह्यातील जे ज्वलंत प्रश्न पाणी,आरोग्य,शिक्षण,सामाजिक, रस्ते आहेत,ते कसे सोडवायचे याकडे प्रामाणिक प्रयत्न करेल, अशी ग्वाही त्यांनी नवरत्न न्यूज रिपोर्टरला बोलताना दिली. मला जनतेनीं मला भरभरून मतदानरुपी प्रेम द्यावे,असे आवाहन नौशाद शेख यांनी केले आहे.

## मग निवडणूक लढवण्यापासून का मागे हटले?

भोपाळ : मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी राजगड लोकसभा मतदारसंघातील सर्वसाधारण सभेला संबोधित करताना एक विधान केले होते. मी मुख्यमंत्री असताना १० वर्षे शेतक-यांकडून विजेचा १ रुपयाही घेतला नाही. याशिवाय घरोघरी मोफत विजेचा लाभही लोकांनी घेतला असे दिग्विजय सिंह यांनी सांगितले.भाजपाने दिग्विजय सिंह यांना आता प्रत्युत्तर दिले आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष विष्णू दत्त शर्मा यांनी दिग्विजय सिंह यांनी मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात एवढी प्रगती केली आहे, तर मग ते लोकसभा निवडणूक लढवण्यापासून का मागे हटले? असा सवाल विचारला आहे. यावेळी लोकसभा निवडणुकीत मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांचीही विश्वासार्हता पणाला लागली आहे. लोकसभा मतदारसंघांतर्गत आठ विधानसभा मतदारसंघ आहेत, त्यापैकी दोन जागा काँग्रेसकडे आहेत, तर सर्व सहा जागा भाजपाकडे आहेत. आता माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह पदयात्रेच्या माध्यमातून लोकांची मने जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत. या लोकसभा मतदारसंघातून ते दोनदा खासदार झाले आहेत, तर त्यांचे भाऊ लक्ष्मण सिंह यांनी चार वेळा खासदारकीची निवडणूक जिंकली आहे.माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी सर्वसाधारण सभेला संबोधित करताना सांगितले की, मी मुख्यमंत्री असताना १० वर्षे शेतक-यांकडून वीजबिल वसूल केले नाही. याशिवाय लोकांनी घरांमध्ये मोफत वीज वापरली. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष विष्णू दत्त शर्मा यांनी दिग्विजय सिंह यांच्यावर निशाणा साधताना म्हटले आहे की, दिग्विजय सिंह यांनी अनेकवेळा आपल्या वक्तव्यात म्हटले आहे की, ते लोकसभा निवडणूक लढवण्यास तयार नाहीत. ते राज्यसभेचे खासदार आहेत, त्यामुळे लोकसभा निवडणूक लढवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. दिग्विजय सिंह यांनी त्यांच्या कार्यकाळात एवढा विकास घडवून आणला, तर त्यांना लोकसभा निवडणुकीची भीती का वाटली? मध्य प्रदेशातील सर्व २९ जागा भाजपा जिंकणार असल्याचेही ते म्हणाले.

## काँग्रेसला मतदान म्हणजे लातूरच्या विकासाला मतदान

### आमदार धिरज देशमुख यांचे प्रतिपादन; लातूर तालुक्यातील विविध गावांत आयोजित संवाद बैठकीत मार्गदर्शन

### डॉ. शिवाजी काळगे लातूरकरांच्या प्रश्नाला योग्य न्याय देतील

लातूर शिक्षणात अग्रेसर आहे. त्यामुळे लातूरला एम्स, आयआयएम, आयआयटी सारख्या संस्थांसाठी पुढाकार घ्यायला हवा. आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात चांगला लौकीक आहे. त्यांनी २५ वर्षे रूग्णसेवा केली आहे. त्यामुळे लातूरकरांच्या प्रश्नाला ते योग्य न्याय देतील आणि लातूर व मराठवाड्याचे नाव उंचावतील, हा विश्वास आहे. त्यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर लातूरकरांमध्ये नवी उमेद, नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. आता आपण सर्वांनी त्यांना बहुमताने विजयी करण्याचा निर्धार करावा, असे आवाहन आमदार धिरज देशमुख यांनी केले.





लातूर : जे जे नवे ते ते लातूरला आणायचे असेल तर काँग्रेस, महाविकास आघाडीचा उमेदवार दिल्लीत पाठवणे गरजेचे आहे. काँग्रेसला मतदान म्हणजे लातूरच्या विकासाला मतदान आहे, असे प्रतिपादन 'लातूर ग्रामीण'चे आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी येथे केले. लातूर लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर ग्रामीण मतदारसंघातील भातांगळी, बोरी, काटगाव, गाधवड, तांदुळजा, चिंचोली ब., गातेगाव पंचायत समिती गणातील विविध गावांतील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी लातूर लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उपस्थितीत संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार धिरज देशमुख बोलत होते. आमदार धिरज देशमुख म्हणाले, भाजप सरकार केवळ मोठ मोठी आश्वासने आणि भपकेबाज जाहिरातीवर चालत आहे. जनतेचा विकासही ते जाहिरातीतूनच दाखवतात. प्रत्यक्षात काहीही नसते. कुठलीही आश्वासने त्यांनी पूर्ण केली नाहीत. आश्वासने का पूर्ण केली नाहीत, असे विचारले तर 'ती जुमलेबाजी होती', असे ते सांगतात. जनतेची दिशाभूल करणाऱ्या अशा फसव्या सरकारला धडा शिकवण्यासाठी सज्ज रहा.

डॉ. शिवाजी काळगे म्हणाले, एका शेतकऱ्याच्या मुलाला लोकसभेची उमेदवारी मिळाली. याबद्दल मी काँग्रेसचे, पक्षातील सर्व नेत्यांचे आभार मानतो. आपण सर्वांनी आता आशीर्वादरुपी मतदान करून मला विजयी करावे आणि सुडाचे राजकारण करणाऱ्यांना, जनतेची दिशाभूल करणाऱ्या भाजपला योग्य जागा दाखवून द्यावी, असे मी आवाहन करतो. यावेळी किरण जाधव, जगदीश बावणे, सुनील पडिले, अनुप शेळके, रविंद्र काळे, सचिन दाताळ, सुभाष घोडके, इम्रान सय्यद, कैलास पाटील, पृथ्वीराज शिरसाठ, दैवशाला राजमाने, धनंजय देशमुख, राजकुमार पाटील, रघुनाथ शिंदे, प्रवीण पाटील, अरुण कुलकर्णी, सत्तार पटेल, मदन भिसे, गोविंद बोराडे, अनंत बारबोले, लक्ष्मण पाटील, अनिल पाटील, जयचंद भिसे, विरसेन भोसले, अमृत जाधव, नंदकुमार देशमुख, वैजनाथ दिवटे, श्रीरंग जटाळ, सतीश पाटील, दगडूसाहेब पडिले, संभाजी रेड्डी, युवराज पाटील, श्रीरंग दाताळ, जितेंद्र स्वामी, धनराज दाताळ, बोगदाद सगरे, बाबू शेख, शब्बीर सय्यद, हरिभाऊ गोणे, कमलाकर अनंतवाड, बालाजी वाघमारे, रघुनाथ शिंदे, कैलास पाटील, मनोज पाटील, शंकर बोळंगे, सरवर शेख, राजेसाहेब पाटील, परमेश्वर पाटील, वाल्मिक माडे, शंकर पाटील, संजय ढोले, महादेव काळे, अशोक काळे, नरसिंग बुलबुले, भैरवनाथ सव्वासे, महारुद्र चौंडे, भीमाशंकर शेटे, महेंद्र भादेकर, बालाजी सुरवसे, सुभाष जाधव, नवनाथ कळबंडे, भाऊसाहेब कावळे, किसनराव लोमटे, महेश अन्नदाते, व्यंकट पिसाळ, विनीता बावणे, माणिकराव भोळे, उस्मान पठाण, संजय चव्हाण, बंकट कदम, दौलतराव कदम, रणजित भिसे, अशोक भिसे, इरफान शेख, नवनाथ शिंदे, अण्णासाहेब भिसे, संभाजी भिसे, साहेबराव पाखरे, निवृती भिसे, गणेश कदम, प्रताप खोसे, शिवाजी देशमुख, शाहूराज पवार, गोवर्धन मोरे, नानासाहेब गायकवाड, सिद्राम गायकवाड व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# संपादकीय....

## दुही माजविण्याचे कारस्थान

प्रा. डॉ. अश्विनी महाजन, ज्येष्ठ विश्लेषक 'द इकॉनॉमिस्ट' या मासिकामध्ये अलीकडेच एक लेख प्रकाशित झाला असून, त्यात दक्षिणेतील विकासाचा आधार घेत खोडसाळपणे या मुद्द्याला राजकीय मुलामा देत भारतातील सत्तारूढ भाजपकडे दक्षिण राज्यांत ठोस पाया नसल्याचे म्हटले आहे. वास्तविक, हे मासिक ज्या ब्रिटनमधून प्रकाशित होते, तेथेच आतापर्यंतच्या कोणत्याही पंतप्रधानाला संपूर्ण देशातून एकसारखा पाठिंबा मिळालेला नाही.लंडनमध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'द इकॉनॉमिस्ट' नावाच्या मासिकात एक कुरापत काढणार्या लेखाच्या माध्यमातून उत्तर आणि दक्षिण भारत यांच्यात फुटीची वेगळी संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण भारतीय राज्ये ही आर्थिकदृष्ट्या उर्वरित भारताच्या राज्यांपेक्षा वेगळी आहेत, असे हे मासिक सांगते. भारतात केवळ २० टक्के लोकसंख्या पाच दक्षिण राज्यांत (आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू आणि तेलंगणा) राहते; मात्र त्यांना एकूण परकी गुंतवणुकीचा ३५ टक्के वाटा मिळतो. या राज्यांनी देशातील अन्य भागांच्या तुलनेत अधिक विकास केला आहे. १९९३ मध्ये ही राज्ये देशातील जीडीपीत २४ टक्के योगदान देत असताना त्याचे प्रमाण आता ३१ टक्क्यांवर पोहोचले आहे.दक्षिण भारतात ४६ टक्के टेक युनिकॉर्न आहेत आणि भारतातून ४६ टक्के इलेक्ट्रॉनिक्स निर्यात याच पाच राज्यांतून होते. तसेच ६६ टक्के आयटी सेवा याच दक्षिण राज्यांतून होते. अशा रीतीने एकप्रकारचा अजेंडा राबविणारे लोक सोडले तर सर्व जगाला ठाऊक आहे की, उत्तर ते दक्षिण आणि पूर्व ते पश्चिमपर्यंत भारत एकसंध आहे. या उपखंडात राहणारे लोक विविध धर्मांचे, जातीचे, भाषांचे, वेशभूषेचे आणि खानपानाची वेगळी शैली अंगीकारणारे असले तरी ते स्वत:ला भारतीय मानतात. भारताच्या वेगवेगळ्या भागांवर वेगवेगळ्या कालखंडांत वेगवेगळ्या शासकांचा अंमल राहिला आहे; मात्र भारतातील सर्व नागरिकांत एक अतूट बंधन होते आणि आहे. देशात विविध भागात असणारी ज्योतिर्लिंगे, तीर्थक्षेत्रे, चारधाम आदी सर्व भारतीयांना संपूर्ण देश आपलाच मानण्याची साक्ष देतात आणि या विविधतेमुळे आपल्या ऐक्यात कधीही अडथळा आलेला नाही, हेही सांगतात.दुर्दैवाने इंग्रजाच्या राजवटीत भारतीय इतिहासात फेरफार करण्याचा प्रयत्न केला आणि जाणीवपूर्वक खोट्या कथानकांचे लेखन केले गेले. परिणामी, दक्षिण भारतीयांच्या मनात उत्तर भारतीयांविषयी द्वेष भरला गेला. आर्य देशाबाहेरून आले आणि त्यांच्या आक्रमणाने द्रविड लोकांना स्थलांतर करावे लागले आणि नाइलाजाने त्यांना दक्षिणेकडे जावे लागले, असे सांगितले गेले. त्यामुळे दक्षिण राज्यांत प्रामुख्याने तामिळनाडूत हिंदी भाषेविषयी तिरस्कार वाढला. या बनावट कथांची सुरुवात एका जर्मन प्राच्यविद्या आणि भाषातज्ज्ञाने केल्याचे सांगितले जाते; पण आज विपुल प्रमाणात शास्त्रीय पुरावे उपलब्ध आहेत.आर्य आक्रमण हे कल्पोलकल्पित असून, त्याविषयी रचलेले कथानक काल्पनिक आहे, हे सांगितले जाते. तरीही भारताच्या वेगवान विकासाबाबत आकस बाळगून असलेल्या पश्चिम देशांकडून अशा प्रकारे दिशाभूल करणारा अजेंडा राबविला जात आहे. दक्षिणेतील विकासाचा आधार घेत ब्रिटिश मासिकाने खोडसाळपणे या मुद्द्याला राजकीय रंग दिला आणि सत्तारूढ भाजपकडे दक्षिण राज्यांत ठोस पाया नाही, असे सांगितले गेले. म्हणून केंद्रातील विद्यमान सरकारकडे संपूर्ण देशाचा कौल नाही, असे मासिकाने म्हटले आहे. 'द इकॉनॉमिस्ट' हे ब्रिटनमध्ये प्रकाशित होते आणि तेथेच आतापर्यंतच्या कोणत्याही पंतप्रधानाला संपूर्ण देशातून एकसारखा पाठिंबा मिळालेला नाही. मग याचा अर्थ पंतप्रधानांना संपूर्ण देशाचा पाठिंबा नाही, असा आहे का? जगभरातील लोकशाहीच्या इतिहासात अशी खूपच कमी उदाहरणे आहेत की, तेथे सर्व क्षेत्रांतून मिळालेल्या मतांच्या आधारे सरकार स्थापन झालेले आहे.याप्रमाणे दक्षिण भारतातील काही नेतेही अशा प्रकारचा तर्क मांडत फुटीरवादी राजकारणाला प्रोत्साहन देत आहेत. काही भ्रष्ट आणि अपात्र नेत्यांमुळे अनेक राज्यांच्या विकासाला खीळ बसली आहे. ईशान्य भागातील अनेक राज्ये ही तत्कालीन केंद्र सरकारच्या उपेक्षेला बळी पडलेली आहेत; मात्र जम्मू-काश्मीरसारख्या अनेक राज्यांत लोकसंख्येच्या तुलनेत अधिक स्रोत उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे देशातील सर्व राज्यांचा विकास हा एकमेकांच्या सहकार्याशिवाय पुढे जाणार नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे. विकासाचा प्रश्न असेल तर सर्वाधिक प्रति व्यक्ती उत्पन्न असलेल्या दहा राज्यांत व केंद्रशासित राज्यांत केवळ दोन दक्षिण राज्ये आहेत आणि तीही पाचव्या व सहाव्या स्थानावर आहेत. यामागचे प्रमुख कारण आयटी क्षेत्र. जसे खाद्यान्न उपलब्ध करून देण्यात उत्तर राज्यांचे मोलाचे योगदान असते, तसेच औद्योगिक उत्पादन, प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक्स व आयटी उत्पादने उपलब्ध करून देण्यात दक्षिण राज्यांचा मोठा वाटा आहे. यानुसार भारत एक कुटुंबाप्रमाणे आहे व सर्व राज्ये ही कुटुंबातील सदस्य. या कुटुंबात कोणी मोठे व कोणी लहान नसते. यात श्रीमंत-गरिबीचा विचार होत नाही; मात्र सर्वांनी एकत्र येत काम करत भारताला समृद्ध करण्याची गरज आहे. आपण 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणजेच संपूर्ण पृथ्वीला एक कुटुंब मानतो.राजकीय उद्देशातून काम करणारे लोक आता दक्षिण राज्यांतील कर निधी हस्तांतरातील भेदभावाचा मुद्दा मांडत उत्तर-दक्षिण अशी नव्याने फूट पाडण्याचे कारस्थान रचत आहेत. दक्षिण राज्यांना केंद्रीय कराच्या त्यांच्या कायदेशीर हिश्श्यापासून वंचित ठेवल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे कर वाटा हा वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर केला जातो. पंधराव्या वित्त आयोगाच्या कार्यवाहीच्या काळात या राज्यांनी केंद्र सरकारसमक्ष तक्रार केली व त्यानुसार वित्त आयोगाने मागील आयोगाने आधार म्हणून गृहीत धरलेल्या १९७१ ऐवजी २०११ ची जनगणना आधार म्हणून गृहीत धरण्याचे निर्देश दिले.

# आदरणीय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर




सविनय जयभीम

ते वर्ष होत १९८४. नांदेड जिल्ह्यातील धर्माबादला मी शासकीय वसतीगृहाचा विद्यार्थी होतो. पहिल्यांदा आपल्याला इथे बघितलं होतं. माझ्या बापाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दोन वेळा बघितलं होतं. मी बाबासाहेबच्या नातवाला बघितलं याचा मला भारी आनंद झाला होता. मी माझ्या बापाला पत्र पाठवून याची माहिती दिली होती.

बाळासाहेब यानंतर बऱ्याच वर्षनी मी पत्रकार म्हणून आपली अनेकदा भेट घेतली. आपल्या मुलाखती घेतल्या. एकदा तर एका वृत्त वाहिनीच्या चर्चेत आपल्यासोबत माझा वाद झाला. आपण माझी थेट लायकी काढली होती. त्या आधी १९९७ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीत बारामती मतदारसंघात आपण इतर रिपब्लिकन नेत्यांना विश्वासात न घेता भाजप पुरस्कृत उनेदवाराला पाठिंबा दिला होता. तेव्हा मी दै. महानगर मध्ये होतो. या संदर्भात मी दिलेली सविस्तर बातमी संपादक निखिल वागळे यांनी हेडलाईन केली होती. या बातनीचा मथळा होता, प्रकाश आंबेडकरांचा भाजपशी सौदा बाळासाहेब आता मी थेट कळीच्या मुद्यावर बोलतो. प्रत्येक निवडणुकित मतदार संघ , उमेदवार निवडीचे आपले निकष काय असतात हे एक मोठं कोडं आहे. आता गेल्या लोकसभा निवडणुकीत सांगली मतदार संघात आपण उमेदवार दिला. तो त्या मनोहर भिडेच्या संपर्कात असलेला आणि संघाची बांधिलकी मानणारा.. त्याच्यामुळे तिथं भाजपचा विजय झाला. लोकसभा निवडणूक संपताच तो भाजपत गेला आणि आता भाजपचा आमदार आहे. अशी प्रत्येक निवडणुकीतील अनेक उदाहरणे देता येतील. उमेदवारी देताना आपल्या कार्यकर्त्यापेक्षा आपण वेगळ्याच मेरिटचा विचार करता आणि आपले हे डावपेच यश मात्र देत नाहीत. निवडणूक संपताच हे उमेदवार आपल्याला सोडून जातात. कारण ते फक्त निवडणुकीतील फायद्यासाठी आपले नेतृत्व मान्य करतांना दिसतात.

बाळासाहेब, संघ, भाजपच्या विरोधाची आपली जहाल भुमिका कागदावरच राहते प्रत्यक्षात त्याचा भाजपला काही तोटा झाल्याचं दिसत नाही. उलटं भाजपचा फायदा झाल्याचं आकडेवारी सांगते.

बाळासाहेब, शरद पवारांबाबत राष्ट्रीय पातळीवर एक संशयाच वातावरण नेहमीच असतं. तशीच परिस्थिती आपल्याबाबत आहे. आपण दिलेला शब्द पाळालच असा विश्वास कोणाला वाटतं नाही. बाळासाहेब हे वेदनादायी चित्र बदलण्याची गरज आहे. शरद पवारांबाबत कोणी काहीही म्हणो, शरद पवारांनी नेमक्या वेळी भाजपसोबत न जाण्याचा निर्णय घेऊन फुले आंबेडकरी विचाराशी बांधिलकी सिद्ध केली आहे. यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यात या टप्प्यावर सर्वोच्च किमत मोजली आहे. देशभरात एक आदर्श म्हणून नावाजलेलं त्यांचं कुटुंब मोडलं. पण पवारांनी कुटुंबाला महत्व न देता फुले आंबेडकरी विचार महत्वाचा मानला. बाळासाहेब राजकारण असो की वैयक्तिक आयुष्य, किमत तर मोजावीच लागते.

बाळासाहेब, भाजप, संघाच्या विरोधात जोराने बोलून वैचारिकदृष्ट्या या शक्तीच्या विरोधात असलेल्या समजाला, मतदारांना गोलबंद करणे ही आपली कार्यपद्धती आहे अशी टिका होत असते. ही टिका गैरलागू असल्याचं सिद्ध करण्याची वेळ आलेली आहे.

बाळासाहेब सध्याचा काळ खुप कठिण आहे. ब्राह्मणी फॅसिस्ट शक्तीचा उदय, विकास आणि सध्याच्या काळातील त्याच चारित्र, त्याची वाटचाल कोणत्या दिशेनं सुरु आहे हे आपल्याला कोणी सांगण्याची गरज नाही. बाळासाहेब या ब्राह्मणी फॅसिस्ट शक्तीचा पाडाव करण्याची वैचारिक आणि मैदानातील ताकद फक्त फुले आंबेडकरी विचारधारेतच आहे, असा माझा ठाम विश्वास आहे. (युरोपात या फॅसिस्ट शक्तिचा पाडाव कम्युनिस्ट विचाराच्या जनतेनं केला असेल पण भारतीय फॅसिस्टांच चारित्र्य आणि स्वरुप वेगळं आहे)

हा संघर्ष अंतिम टप्प्यावर आहे , तेव्हा बाळासाहेब या लढ्याचे अग्रदुत व्हा आपण............महाराष्ट्र नव्हे तर देशातील लोकशाहीवादी जनता आपल्याकडून हीच अपेक्षा करतेय सध्या. आपला कॉंग्रेसवर राग आहे. (माझ्या वंचिताचे राजकारण या पुस्तिकेत यावर सविस्तर लिहिलं आहे)...... खास करुन यशवंतराव चव्हाण , शरद पवार यांच्यावर आपला वैयक्तिक राग आहे. भैयासाहेब आंबेडकर यांना यशवंतराव चव्हाण यानी त्रास दिलेला आहे आणि कॉंग्रेस/राष्ट्रवादी संपल्याशिवाय नवीन काही उभं राहणार नाही अशी आपली भुमिका आहे.......पण बाळासाहेब यांना संपवण्याच्या नादात भाजप किती वरचढ झाला हे समजलचं नाही. बाळासाहेब हेही मला मान्य आहे की पुरोगामी पक्ष आणि कॉंग्रेस, राष्ट्रवादीला बळ देणं , निवडून आणणं ही काही आपली जबाबदारी नाही आणि प्रस्थापित पक्षाचे नेते भाजपसोबत साटलोट करतात पण आता काळ सोकावला आहे याचं भान आपल्यालाच ठेवावं लागेल.

बाळासाहेब , सध्या आपणच सांगत आहात की मोदीची सत्ता पुन्हा आली तर संविधान आणि देश काहीच शिल्लक राहणार नाही. (तसं आताही फारसं काही त्यांनी शिल्लक ठेवलेलं नाहीच. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य घटनेद्वारे निर्माण केलेल्या घटनात्मक संस्था मोडित काढलेल्या आहेतच) तर मोदी आणि शक्तीसाठी ही अटीतटीची लढत आहे. लोकशाहीवादयांसाठी निर्णायक निवडणूक असेल. तर मग, *बाळासाहेब तुमच्यासाठीही ही शेवटचीच संधी आहे. तेव्हा ही संधी आपण वाया जाऊ देऊ नका. बाळासाहेब तुम्ही फक्त लढण्याचा आदेश द्या, बाळासाहेब.... (१) घटनाकाराचा नातू, (२) प्रबोधनकारांचा नातू आणि राष्ट्र निर्माण कार्यासाठी नेहमी बाबासाहेबांचं सहकार्य घेणाऱ्या व बाबासाहेब आंबेडकरांचा प्रचंड आदर करणाऱ्या (३)पंडित नेहरू यांचा पणतू देशात एकत्र फिरले, तर बाळासाहेब सारा देश ढवळून निघेल. बाळासाहेब या आपल्या ताकदीपुढे कोणी कितीही मोठा असो, ५६ इंचवालाही टिकणार नाही. तेव्हा बाळासाहेब, ही संधी गेली तर इतिहास आपल्याला कधीही माफ करणार नाही. आणि इतिहासाला कोण कोणाचा नातू आहे याचं भान नसत, बाळासाहेब.

*********

**जयभीम**
**बंधुराज लोणे**
**( ९८६९१९७९३४ )**

# तरुणांच्या देशात तरुणांच्या हाती काय?

भारतीय लोकशाही जगातील सर्वात सुंदर व मजबूत लोकशाही आहे. संविधानानुसार लोकशाहीची अंमलबजावणी केली तर लोकशाही च्या जोरावर भारत जगावर राज्य करू शकतो. परंतु भारतात विषमता एवढी खोल रुजलेली आहे की माणूस माणसाचा द्वेष करून जाती धर्माच्या नावावर माणूस माणसासोबत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष लढत आहे. छत्रपती शाहु महाराज यांची खंत होती की आज ज्यांच्या हातात धर्मसत्ता आहे त्याच लोकांच्या हातात स्वतंत्र देशाची जाऊ नये. धर्मसत्तेवर वर्चस्व असलेल्या लोकांच्या हाती स्वतंत्र भारताची सत्ता गेली तर सर्वसामान्य माणसाला न्याय मिळणार नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची एक खंत होती की संविधान कितीही चांगले असले तरीही ते राबणारे लोक चांगले नसतील तर त्याचा फायदा लोकांना होणार नाही. या दोनही महापुरुषांची खंत आजही तंतोतंत वास्तवात उतरली आहे. ब्रिटीशांच्या गुलामगिरी मधुन आपल्याला स्वातंत्र्य तर मिळाले पण राजकारणी लोकांच्या गुलामीमध्ये अडकून बसलो. राजकीय नेत्यांची गुलामीने माणूस एवढा लाचार व बुद्धीहीन झाला की त्याला वास्तव परिस्थिती समजून घ्यायला वेळच नाही. नेते सांगतील तेच अंतिम सत्य समजणारे अनेक भक्त निर्माण झाले. जे लोक जागृत व देशाप्रती इमानदार आहेत. जात, धर्म, नेत्यांची भक्ती यापुढे जाऊन सामाजिक समस्यांचे निराकरण होऊन संविधानाची अंमलबजावणी होऊन सर्वांगीण विकास व्हावा, शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा व इतरही मुलभूत सुविधा प्रत्येक नागरिकांना मिळाव्यात. शासन प्रशासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ देशातील नागरिकांना समान पात्रतेवर मिळावा या साठी बोलणारा, लिहणारा, निरपेक्ष व परखड मत मांडणारा व्यक्ती भक्तांना धर्म विरोधी, नेता विरोधी वाटतो. मुळात भारत देश हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो परंतु देशात जर बघीतले तर तरुणांच्या हाती काय आहे? तरुणांच्या हाती गुणवत्तेचे शिक्षण असायला पाहिजे, तरुणांच्या हाती रोजगार असायला पाहिजे, तरुणांच्या हाती देशाच्या हिताचे निर्णय घेण्याचा अधिकार पाहिजे. परंतु वास्तवात तरुणांच्या हाती बेरोजगारी आहे, हप्त्यावर घेतलेला मोबाईल आहे, दोन जिबी डाटा आहे, नेत्याचा आदेश आला की हातात दगड आहे जो जाती धर्माच्या नावाखाली फेकून तरुणांचे आयुष्य उध्वस्त व नेत्यांच्या आदेशाचे पालन करते. तरुणांच्या हाती दारुची बाटली आहे, तरुणांच्या हाती नशेची पुडी आहे. तरुणांसमोर खुप समस्या आहेत. शासकीय नोकरी नाही म्हणून तरुणांचे लग्न होत नाहीत. तरुणांच्या लग्नासाठी किती मेहनत घ्यावी लागते हे तरुणांना व त्यांच्या घरच्यांनाच माहिती असते. तरुणांच्या देशात तरुणांच्या समस्या जास्त का आहेत तर तरुणांच्या हाती सत्ता नाही, तरुणांच्या हाती देशाच्या हिताचे निर्णय घेण्याचा अधिकार नाही. देशात संविधान लागु झाले आणि लोकशाही निर्माण झाली परंतु देशात अनेक धर्मग्रंथांनी माणासाला माणूस म्हणूनही नाकारले होते, माणसाचा माणसाला विटाळ होईल अशी निच संस्कृती येथे पेरली होती, माणसाला अज्ञानात ठेवून त्यांना माणसिक गुलाम बनवून त्यांचे शोषण करणाऱ्या धुर्त लोकांना लोकांचे कल्याण व लोकांना हक्क अधिकार मिळणे, सर्वांना समान दर्जा व संधी निर्माण करणे म्हणजे धर्म विरोधी वाटून स्वतः ची तळफळाट होत होती. म्हणून संविधान लागु होऊनही, संविधान प्रत्येकांच्या उद्धाराचे माध्यम असतानाही संविधानाची जनजागृती झाली नाही, संविधाना बद्दल आजही लोकांना आदर नाही हे सर्व जाणीव पुर्वक करण्यात आले. लोकांना लोकशाही व संविधान कळूच नये याचे पुर्ण नियोजन केले गेले. याचाच परिणाम लोकशाही असुनही लोकांनी घराणेशाही जोपासली. धर्मसत्ता ज्यांच्या हाती होती त्यांच्या च हाती राजसत्ता असल्याने लोकशाही संपवण्याचे पद्धतशीर पणे सुरू केले. बहुतांश राजकीय पक्ष विशिष्ट जातीच्या लोकांचेच, पक्षाचे उमेदवार विशिष्ट जातीचेच, ज्यांनी विषमता, अंधविश्वास, अस्पृश्यता पाळून मानसाला माणसाजवळ येऊ दिले नाही ते लोक संसदेमध्ये जातात. निरपेक्ष, वैचारिक व लोककल्याण करणारे नेते संसदेत कमी असल्याने लोकशाहीचा गैरवापर करून बहुमताच्या आधारे लोकहीताच्या विरोधात जास्त निर्णय घेऊन सर्वसामान्य लोकांच्या समस्या वाढवण्यासाठी याच लोकांनी मदत केली. वर्षानुवर्षे एकाच घरातील आमदार खासदार असताना ही अजूनही त्या मतदारसंघात रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य सुविधा नसतील आणि आमदार खासदारांच्या संपती मध्ये हजारो पटीने वाढ होत असेल तर ही कमाई ईमाणदारीची असेल का? हा प्रश्न ही विचारण्याची हिंमत आजच्या तरुणांमध्ये आहे का? शिक्षण घेऊनही डोक्याचा वापर न करणाऱ्या आणि सत्याचा स्विकार न करता चुकिच्या गोष्टी, अंधविश्वास आणि नेत्यांची गुलामी करण्यात धन्यता माणणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. तरुणांना नको त्या विषयामध्ये गुरफटून ठेवून महत्वाच्या विषयाची तरुणांना जाणिवच होऊ नये यासाठी पुर्ण नियोजन केले जाते. आता तर व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर तरुणांना विद्वान बनवण्याचे काम सुरू आहे. तरुणांचे प्रश्न मांडण्यासाठी, तरुणांच्या समस्या सोडविण्यासाठी तरुण उमेदवार घराणेशाही मोडीत काढून काम करणाऱ्या लोकांना संधी देणे आवश्यक असताना म्हाताऱ्या लोकांना पक्ष उमेदवार जाहीर करून म्हातारे लोक तरुणांचा रोजगार, पेन्शन, शिक्षण बंद करून म्हाताऱ्या आमदार खासदारांचा पगार, पेन्शन भरगच्च करून खाजगीकरणाच्या माध्यमातून आमदार खासदार यांच्या च महाग शिक्षणसंस्था उदयास येत आहेत. आमदार, खासदारांच्या शिक्षण संस्था, पतपेढी याठिकाणी कर्मचाऱ्यांना कमी पगार देऊन जनकल्याण करतात. जे लोक जनतेचा पैसा स्वतः कडे वळून त्यातून बँक, शिक्षणसंस्था व इतर उत्पन्नाचे साधन उपलब्ध करत असतील आणि कामगारांना वेळेवर कमी आणि वेळेवर पगार देत नसतील तर ते किती जनकल्याण करत असतील याची जाणीव होते. एवढे असुनही तरुणांना तेचे नेते, तेच पक्ष जर आपले वाटत असतील तर हे तरुणांच्या बौद्धिक मागासले पणाचे लक्षण आहे. सोशल मिडिया चा वापर करून नेत्याची भक्ती करून एकमेकांना सोबत वाद घालणारे कार्यकर्ते यांना नेते कोणतेही असो, पक्ष कोणताही असो दिवसभर विरोधात बोलताना जरी दिसत असले तरीही रात्री ते सोबतच जेवन करतात आणि तरुण मात्र वैयक्तीक वाद वाढवून स्वतः चे नुकसान करून नेत्याप्रती ईमानदार असल्याचे भासवतात. राजकीय नेत्यांमुळे, त्यांच्या भ्रष्टाचारामुळे तरूण बेरोजगार आहेत, शेतकरी फासावर चढत आहेत, महिला सुरक्षित नाहीत, शिक्षणाचे बाजारीकरण झाले, मतदारसंघाती वेगवेगळे कंत्राट जवळच्याच लोकांना देऊन बाकीच्या लोकांना भिकेला लावणारे नेते होतात तरी कसे? आणि अशा लोकांना डोक्यावर घेऊन मिरवताना आपल्या अडचणी त नेता आपल्याला न ओळखतही नसताना नेत्यांना डोक्यावर घेण्यात कोणते शहाणपण असेल? राजकीय सत्तेचा, लोकशाही चा बहुतांश तरुणांना फायदा होत नसेल आणि लोकशाही चा गाभा समजल्या जाणाऱ्या निवडणूक मध्ये इव्हिएमच्या माध्यमातून मतांची हेराफेरी होत असेल, आणि बहुतांश जनसमुदाय इव्हिएम विरोधात असताना केवळ राजकीय झोळी भरून घेण्यासाठी आणि लोकशाहीची हत्या करून हुकुमशाही लागु होत असेल तर या मध्ये तरुणांचा फायदा तर नाहीच पण देशाची अधोगती मात्र निश्चितच आहे. राजकीय पक्ष तरुणांना संधी देतो म्हणतात परंतु तरुणांचा वापर फक्त दंगली आणि सभेमध्ये गर्दी जमण्यासाठीच होतो. म्हणून एकाही राष्ट्रीय पक्षाचा अध्यक्ष हा तरुण नाही. घरात बापाला काही समजत नाही म्हणून बापाला शिव्या देऊन लाता मारणारे मात्र राजकीय नेत्याच्या पायावर नतमस्तक होतात तेव्हा गुलामी मजबूत झाल्याची जाणीव होते. एकाच घरातील नेते होत असतील आणि एकाच जातीच्या हातात बहुतांश सत्ता असेल तर तेथे लोकशाही आहे असे कसे म्हणता येईल? एखाद्या ची संख्या जास्त असेल आणि शासन प्रशासन मध्ये संख्या जास्त असेल तर काही वावगे नाही. परंतु संख्येने कमी असून मोक्याच्या जागेवर जास्त प्रमाणात असतील तर लोकशाही मध्ये केलेला सर्वात मोठा भ्रष्टाचार असेल. म्हणून देशाचा व जनतेचा विचार केला तर लोकशाही चा खऱ्या अर्थाने ज्यांना फायदा व्हायला पाहिजे त्यांना झालाच नाही. तरुणांचा देश जरी असला तरीही तरुणांच्या हाती काय आहे. हा गंभीर प्रश्न देशाचे वास्तव चित्र दाखवतो.



*************

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# उन्हाळ्यात रोज एक ग्लास ताक प्या, हे आजार तुमच्या जवळपास फटकणार देखील नाही

उन्हाळा सुरू असून या ऋतूमध्ये स्वतःला निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यासाठी आरोग्यदायी गोष्टींचे सेवन करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. तुम्हालाही या उन्हाळ्यात उष्णतेची लाट आणि पाण्याची कमतरता टाळायची असेल, तर तुम्ही रोज एक ग्लास ताक खाऊ शकता. दह्यापासून ताक तयार केले जाते. व्हिटॅमिन ए, बी, सी आणि ई सारखे अनेक प्रकारचे पोषक घटक ताकामध्ये आढळतात. जे शरीराला अनेक समस्यांपासून वाचवण्यास मदत करते. ताक हे एक सुपर हेल्दी पेय आहे, जे उष्णतेपासून संरक्षण आणि शरीराला थंड ठेवते. चला तर मग विलंब न लावता जाणून घेऊया उन्हाळ्यात ताक पिण्याचे फायदे- ताक पिण्याचे फायदे- पाण्याची कमतरता भासत नाही- ताक हे पोषक तत्वांचे भांडार आहे. त्यात मीठ, साखर आणि पुदिना टाकून प्यायल्याने डिहायड्रेशन, डायरिया आणि उष्णता टाळता येते. या पेयाचे सेवन केल्याने पाण्याची कमतरता भासत नाही. पोटासाठी योग्य - सिडिटी आणि पोटात जळजळ होत असेल तर ताक सेवन करा. जेवणानंतर ताक खाल्ल्याने आम्लपित्त आणि पोटात जळजळ होण्यापासून आराम मिळतो.वजन कमी करण्यात मदत होते- उन्हाळ्यात वजन कमी करणे खूप कठीण होऊन बसते. तुम्हालाही तुमचे वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तर तुम्ही ताक सेवन करू शकता. ताकामध्ये कॅलरीज आणि फॅट कमी असते. उन्हाळ्यात याचे सेवन केल्याने चरबी लवकर जाळली जाऊ शकते.त्वचा निरोगी राहते- उन्हाळ्यात त्वचेशी संबंधित समस्या मोठ्या प्रमाणात



दिसून येतात. तुम्हालाही तुमची त्वचा निरोगी ठेवायची असेल तर तुम्ही ताक सेवन करू शकता. प्रथिने, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन ए हे गुणधर्म ताकामध्ये आढळतात, ज्यामुळे त्वचा निरोगी राहण्यास मदत होते.अस्वीकरण: ही सामग्री, सल्ल्यासह, केवळ सामान्य माहिती प्रदान करते. हे कोणत्याही प्रकारे पात्र वैद्यकीय मताचा पर्याय नाही. अधिक माहितीसाठी नेहमी तज्ञ किंवा तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. वेबदुनिया या माहितीची जबाबदारी घेत नाही.

# वाढले असेल तर किचनमधील या मसाल्यांचे सेवन सुरू करा

चव वाढवण्यासाठी जेवणात मसाले टाकले जातात, पण हे मसाले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी कमी परिणाम दाखवत नाहीत. आरोग्याशी संबंधित विविध समस्या कमी करण्यासाठी विविध स्वयंपाकघरातील मसाल्यांचा वापर केला जाऊ शकतो. उच्च कोलेस्टेरॉल ही देखील अशीच एक आरोग्य समस्या आहे ज्यामध्ये रक्तवाहिन्या ब्लॉक होऊ लागतात आणि शरीराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये रक्त योग्यरित्या पोहोचत नाही. अशा परिस्थितीत खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी काही मसाल्यांचा आहारात समावेश केला जाऊ शकतो. हे मसाले शरीराचे एकूण आरोग्य तर चांगले ठेवतातच, पण चांगले कोलेस्टेरॉल वाढवण्यासाठी आणि वाईट कोलेस्टेरॉल कमी करण्यातही ते प्रभावी आहेत. येथे जाणून घ्या उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या दूर करण्यासाठी कोणते मसाले सेवन केले जाऊ शकतात.उच्च कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी मसाले दालचिनी- दालचिनीचे सेवन विशेषतः हृदयाच्या समस्या दूर करण्यासाठी फायदेशीर ठरते. दालचिनी रक्त प्रवाह सुधारते आणि अंतर्गत अडथळे दूर करण्यासाठी प्रभावी आहे. दालचिनीमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-मायक्रोबियल गुणधर्म देखील आढळतात जे इन्सुलिन उत्पादनास देखील समर्थन देतात. रक्तातील कोलेस्टेरॉल



कमी करण्यासाठी दालचिनीचा चहा प्यायला जाऊ शकतो किंवा वेगवेगळ्या खाद्यपदार्थांमध्ये त्याचा समावेश केला जाऊ शकतो.हळद- औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या हळदीचा आयुर्वेदातही मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. यातून शरीराला एकच नाही तर अनेक फायदे मिळतात. त्यात कर्क्युमिन नावाचे सक्रिय संयुग देखील आढळते. त्याच वेळी, हळद अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांचा चांगला स्रोत आहे. याच्या सेवनाने कोलेस्टेरॉल कमी करण्याचा परिणाम होतो.मेथीदाणा- पिवळ्या मेथीचे दाणे आरोग्यासाठी अनेक फायदे देतात. या धान्यांमध्ये कोलेस्ट्रॉल कमी करणारे गुणधर्म असतात. मेथीचे दाणे देखील शरीराला डिटॉक्स करतात. या धान्यांचे सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल कमी होण्याचा परिणाम होतो. तुम्ही मेथीचा चहा बनवून पिऊ शकता किंवा एका भांड्यात मेथीचे दाणे रात्रभर भिजवून सकाळी हे दाणे खाऊ शकता.ओवा- कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी ओव्याचे सेवन देखील फायदेशीर ठरू शकते. चांगले कोलेस्ट्रॉल वाढवण्यासाठी आणि खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी सेलेरी प्रभावी आहे. त्यात फॅटी ॲसिड्स आणि आहारातील फायबर देखील मोठ्या प्रमाणात आढळतात.अस्वीकरण: ही सामग्री, सल्ल्यासह केवळ सामान्य माहिती प्रदान करते. हे कोणत्याही प्रकारे पात्र वैद्यकीय मताचा पर्याय नाही. अधिक माहितीसाठी नेहमी तज्ञ किंवा तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. वेबदुनिया या माहितीची जबाबदारी घेत नाही.

# पहिला आघात महिलांवरच!

घराघरांमध्ये वाद नाहीत, असे घर नाही! संवाद निरोगी असणे हे कुटुंबाला केव्हाही लाभदायक असते. पण, जेव्हा कुटुंबामध्ये वादाचे टोक गाठले जाते तेव्हा हिंसाचार सुरू होतो आणि मग अनेकानेक गुन्ह्यांना निमंत्रण दिले जाते. कुटुंब कलहातून होणाऱ्या गुन्ह्यांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून आढावा घेणारे सदर एखाद्या घरात कोणीतरी आत्महत्या केली असेल..आपल्या जोडीदाराचा खून केला असेल..घरातील व्यक्तींना रोज मारहाण होत असेल..जोडीदार किंवा सासू-सून एकमेकांना फसवत असतील.. तर असे घर हे अकार्यक्षम बनते. त्या घरातील व्यवहार तुकड्या तुकड्यात किंवा ठप्प होतात. एकूणच त्या घरातले वातावरण सतत बिघडलेले आणि भावनिक पातळीवर प्रदूषित झालेले असते. जेव्हा कौटुंबिक वाद विकोपाला जातात तेव्हा छळ सुरू होतो आणि तो छळ विविध प्रकारे अविष्कारित होतो. मग आपल्या मुलांवर अत्याचार सुरू होतात, आपल्या आई-वडिलांवर अन्याय केला जातो, आपल्या जोडीदाराला सतत छळले जाते, मग ते मानसिक पातळीवर असो नाहीतर शारीरिक पातळीवर. यातून निर्माण होणारा घरगुती हिंसाचार हा गुन्हेगार निर्माण तर करतोच; पण त्याही पलीकडे समाजाचा पाया हा डळमळीत करून सोडतो.घरगुती हिंसाचार आपल्या प्रिय व्यक्तीच्या वर केला गेलेला एक प्रकारे अत्याचाराच असतो. या अत्याचाराचे पदर वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होतात.. शारीरिक मारहाण किंवा शरीराचा वापर



करणे सुरू होते.. शाब्दिक कोंडमारा केला जातो किंवा शब्दांचा मार सतत दिला जातो.. भावनिक स्फोट घडत राहतात.. आर्थिक अस्थिरता कुटुंबाला वेठीस धरते.. धार्मिक कर्मकांडे आणि बुवा-पुजारी यांना बळी पडण्याचे प्रमाण वाढतेनिर्माण होणाऱ्या मुलांवर अतिशय घातक परिणाम होतात.. आर्थिक छळ आरंभला जातो.. आणि लैंगिक अत्याचार सातत्याने होत राहतात. विकृत मानसिकता! बऱ्याच वेळा जीव गुदमरून जाईल एवढा त्रास दिला जातो, शरीर झोडपले जाते. स्त्रीच्या लैंगिक अवयवांचे विकृतीकरण केले जाते, काही वेळा ॲसिड फेकून मारणे किंवा हातपाय तोडणे इथपर्यंत मजल जाते. तर काही वेळा खून केले जातात. हे सारे घडते ते विशिष्ट अशा विकृत मानसिकतेतून! सतत त्रास देण्याची मानसिकता. दुसऱ्यावर संपूर्ण नियंत्रण ठेवण्याची मानसिकता. दुसऱ्याला सतत तपासत राहण्याची मानसिकता. दुसऱ्याचा पाठलाग करण्याची मानसिकता किंवा दुसऱ्याचे आयुष्य छिन्नविच्छिन्न करून टाकण्याची मानसिकता. ही विकृत मानसिकता असते आणि यात दुसरे म्हणजे तिसरे कोणी नसून, आपल्याच कुटुंबातले कोणीतरी असते!महिलाच सर्वाधिक पीडित!जगभरात कुटुंबातील कोणती व्यक्ती सर्वात जास्त या सर्व गुन्ह्यांना बळी पडत असेल तर ती म्हणजे स्त्री. जागतिक मानसिक आरोग्य संघटनेने तीन पैकी एका स्त्रीवर सातत्याने घराघरांत अत्याचार केला जातोय, असे सांगितले आहे. कित्येक देशांमध्ये अशा पद्धतीने घरगुती हिंसाचार करणे हे विशेष काही नाही अशा तऱ्हेने पाळले जाते. असेही आढळून आले आहे की ज्या देशात स्त्री-पुरुष असमानता आहे, समतेचा न्याय नाही, त्या देशांमध्ये घरगुती हिंसाचार हे प्रचंड मोठ्या प्रमाणावर आहेत.ज्या देशांमध्ये स्त्री आणि पुरुष यांचा एकमेकांबद्दल आदर, समान न्याय वाणूक आणि एकमेकांना समजून घेणे घडते तेथे घरगुती हिंसाचार अतिशय कमी प्रमाणात दिसून येतो. कुटुंबे फुटतात, विस्कळीत होतात. त्याला जबाबदार कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती असते. त्या प्रत्येक व्यक्तीचे वागणे असते. गुन्हेगारीपर्यंत जाऊ नये याची खबरदारी घेणं प्रत्येक व्यक्तींचं कर्तव्य आहे, हे समजून घेणे फार महत्त्वाचं आहे.

# फक्त १० मिनिटे काढा अन् रोज मार्जारासन करा, दिवसभर राहाल उत्साही

जर तुम्हाला दिवसभर उत्साही वाटत नसेल आणि शांत झोप येत नसेल तर व्यायाम करणे गरजेचे आहे. सकाळी व्यायाम केल्याने अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. तुमच्या निरोगी आरोग्यासाठी सकाळी १० मिनिट काढून योग केल्यास थकवा,आळस कमी होतो. यासाठी मार्जारासन करू शकता. चला तर मग जाणून घेऊया त्याचे फायदे आणि ते कसे करावे.मार्जारासन कसा करावा मार्जारासन करण्यासाठी सर्वात आधी सपाट जागेवर खाली सरळ बसावे. नंतर दोन्ही गुडघे पुढे नेऊन गुडघ्यांवर बसावे.नंतर दोन्ही हात गुडघ्याच्या पुढे न्या आणि खाली टेकवा.त्यानंतर दोन्ही हातांच्या मनगटांवर भार टाकत नितंबाचा भाग वर आणायचा प्रयत्न करा.दोन्ही मांड्यावरच्या बाजूला नेत सरळ रेषेत आणण्याचा प्रयत्न करा.या मुद्रेमध्ये तुमच्या छातीचा भाग जमिनिला समांतर असेल,समोरून पाहणाऱ्याला तुम्ही मांजरीच्या पोझमध्ये दिसाल.नंतर मोठा श्वास घ्या आणि डोक्याचा भाग मागच्या बाजूला आणा. यानंतर पाठीचा कणाच्या शेवटचा भाग वर आणण्याचा प्रयत्न करा.मार्जारासन करण्याचे फायदे पाठदुखी कमी अनेक लोक लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर जास्त वेळ काम करतात. अशा लोकांना मान आणि पाठदुखीचा त्रास होतो. हा योग केल्याने पाठदुखी कमी होते.मन शांत राहते हा योग केल्याने शरीर आणि मन दोन्ही शांत राहते. तसेच तुम्ही कामावर अधिक लक्ष केंद्रित करू शकता.गंभीर आजार दूर राहतात तुमचे शरीर आणि मन दोन्ही निरोगी राहतात. हा योग नियमित केल्यास अनेक प्रकारचे आजार दूर राहतात.शरीराचे संतुलन हा योग केल्याने शरीराचे संतुलन सुधारते आणि आसनाशी संबंधित कोणतीही समस्या उद्भवत नाही.पाठीचा कणा नियमितपणे सकाळी हा योग केल्याने पाठदुखीपासून आराम मिळतो आणि पाठीचा कणा मजबूत होतो.

# उष्माघात रोखण्यासाठी अशी घ्या तुमच्या आरोग्याची काळजी

हीट वेव्ह किंवा उष्णतेची लाट ही एक मूक आपत्ती (सायलेंट डिझास्टर) आहे. सलग तीन दिवस कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ डिग्री सेल्सियसने जास्त असेल, तर त्याला उष्णतेची लाट म्हणतात. सलग दोन दिवस तापमान ४५ अंशावर असल्यास उष्णतेची लाट आली आहे, असे समजावे. यामुळे होणारी हानी टाळण्यासाठी हीट ॲक्शन प्लॅन आखण्यात येतो.उष्माघात गंभीर बाब आहे. शरीराचे तापमान जेव्हा १०६ डिग्री सेल्सिअस १५ मिनिटांकरिता राहते. तेव्हा शरीरावर परिणाम होतात. शरीराची तापमान नियंत्रण यंत्रणा काम करीत नाही. प्रथिने उष्णतेमुळे खराब होतात.विविध प्रकारचे




लायपो प्रोटिन्स आणि फॉस्पोलिपिडस अस्थिर होतात. शरीरातील मेद पदार्थ वितळतात. यामुळे रक्ताभिसरण संस्था अकार्यक्षम होते. अवयवांचे कार्य ठप्प होऊ लागते. वेळेवर तातडीची वैद्यकीय सेवा न मिळाल्यास मृत्यूची शक्यता असते.उष्णतेमुळे शरीरावर रॅश उमटतात हातापायाला गोळे व चक्कर येते तापमान १०६ वर गेल्यास मृत्यूची शक्यता बचाव करण्यासाठी हे करा...पुरेसे पाणी प्यावे. पाणी सोबत ठेवावे.हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरावे.उन्हात गॉगल, छत्री, पादत्राणे वापरावा.उन्हात टोपी/ हॅट खाली ओलसर कपडा ठेवावे.पाळीव प्राण्यांना सावलीत, थंड ठिकाणी ठेवावे.कष्टाची कामे सकाळी किंवा संध्याकाळी ४ नंतर करावी.ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा.हे करू नका शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे टाळा.पार्क केलेल्या वाहनात लहान मुलांना ठेवू नका. गडद रंगाचे, तंग कपडे वापरू नका.उन्हाच्या काळात स्वयंपाक करणे टाळा.स्वयंपाक घर हवेशीर ठेवा.मद्य, चहा, कॉफी, सॉफ्ट ड्रिंक्स टाळा.उष्णतेचा त्रास कुणाला होतो ?उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक वृध्द आणि लहान मुले स्थूल लोक, अयोग्य कपडे घालणारे,पुरेशी झोप न झाल्यास गर्भवती महिला अनियंत्रित मधुमेह हृदयरोग असणारे अपस्मार रुग्ण दारुचे व्यसन असणारे काही विशिष्ट औषधे घेणारे निराश्रित, बेघर नागरिक बस स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन, बाजारपेठा, धार्मिक ठिकाणी, बँका, पेट्रोल पंप, मुख्य रस्ते आदी ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. उन्हात लोकांना विश्रांतीसाठी थंड सावलीच्या जागा निर्माण करण्यासोबतच बागा, धार्मिक ठिकाणे, धर्मशाळा दिवसभर खुल्या ठेवण्यात येतात. कार्यालये, शाळा महाविद्यालये यांच्या कामाच्या वेळा बदलण्याची गरज आहे, हे लोकप्रबोधनाचे विषय हीट क्शन प्लॅनअंतर्गत राबवावे लागतात.

# उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी फायदेशीर आहेत 'हे' खाद्यपदार्थ, हृदय ही राहील निरोगी

सध्याचे धावपळीचे जीवन, बिघडलेला आहार, व्यायामाचा अभाव आणि चुकीच्या सवयींमुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. या समस्यांमध्ये उच्च रक्तदाबाची समस्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. उच्च रक्तदाब ही त्यापैकीच एक गंभीर समस्या आहे. ज्यामुळे, आजकाल अनेक लोक त्रस्त आहेत.उच्च रक्तदाब आजकाल तरूणांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांमध्ये आढळतोय. ही समस्या सायलेंट किलर म्हणून ही ओळखली जाते, जी आरोग्यासाठी प्राणघातक ठरू शकते. उच्च रक्तदाबामुळे तुम्हाला



भविष्यात हृदयविकार होण्याची शक्यता असते. उच्च रक्तदाबाच्या समस्येमध्ये एखाद्या व्यक्तीची रक्तदाबाची पातळी सामान्यापेक्षा जास्त होते आणि त्यामुळे, रक्तवाहिन्यांवर दबाव येऊ लागतो. ज्यामुळे, हृदयविकारासारख्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते.अशा परिस्थितीमध्ये तुम्ही उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य आहार घेणे गरजेचे आहे. त्यासाठी तुम्ही आहारात काही खाद्यपदार्थांचा समावेश करू शकता. या खाद्यपदार्थांमुळे तुमचा रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकेल. कोणते आहेत हे खाद्यपदार्थ? चला तर मग जाणून घेऊयात. हिरव्या पालेभाज्या हिरव्या पालेभाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात पोषकघटकांचा समावेश आढळून येतो. त्यामुळे, या भाज्या आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. खनिजे आणि जीवनसत्वांच्या विपुल प्रमाणामुळे शरीराला ऊर्जा मिळते. हिरव्या पालेभाज्यांचे सेवन केल्याने आपल्या आरोग्याला अनेक फायदे होतात.या हिरव्या पालेभाज्यांपैकी एक असलेल्या पालक आणि मेथीमध्ये मॅग्नेशिअम आणि पोटॅशिअमचे मुबलक प्रमाण आढळते. त्यामुळे, या भाज्यांचे सेवन केल्याने उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत होते. टोमॅटो टोमॅटोचा वापर करून आपण कितीतरी प्रकारचे खाद्यपदार्थ बनवतो. अनेक भाज्यांमध्ये, करीमध्ये, सॉसेसमध्ये टोमॅटोचा प्रामुख्याने वापर केला जातो. टोमॅटोमध्ये मुबलक प्रमाणात पोषकघटकांचा समावेश आढळून येतो.टोमॅटो आणि टोमॅटो आधारित खाद्यपदार्थांमध्ये पोटॅशिअम, कॅरोटीनॉईड आणि लाईकोपीनचे प्रमाण आढळते. जे आपले हृदय निरोगी ठेवण्यास फायदेशीर आहे. यामुळे उच्च रक्तदाबासारख्या आणि हृदयाला हानिकारक ठरणाऱ्या घटकांचा धोका ही कमी होतो. त्यामुळे, तुमच्या आहारात टोमॅटोचा आणि टोमॅटोवर आधारित असणाऱ्या खाद्यपदार्थांचा जरूर समावेश करा. सॅलमन मासे खायला अनेकांना आवडते. सॅलमन हा मासा जगभरात मोठ्या प्रमाणात आढळून येतो. हा मासा चवीने खाल्ला जातो. सॅलमनमध्ये ओमेगा-३ फॅटी सिड आढळून येते. ज्यामुळे, आपल्या हृदयाचे आरोग्य निरोगी राहते. शिवाय, सॅलमनचे सेवन केल्याने रक्तदाब नियंत्रणात येण्यास मदत होऊ शकते.डिस्क्लेमर : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. सकाळ माध्यम समूह अशा कोणत्याही गोष्टींची पुष्टी करत नाही. अधिक तपशीलांसाठी तुम्ही तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊ शकता.

# किनवट : २१ प्रकल्पात ४८.९३ टक्के जलसाठा

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) तीन वर्षांपासून तालुक्यात पावसाने वार्षिक सरासरी ओलांडल्यामुळे पावसाळ्यात सर्व प्रकल्प तुडुंब भरले होते. या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामास पाणी पुरवठा करूनही सध्या किनवट तालुक्यातील एकूण २१ जलप्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठा ४७.९३ टक्के असा समाधानकारक आहे. त्यामुळे यंदाही पाणी टंचाईच्या समस्या भेडसावण्याची शक्यता कमी आहे. किनवट तालुक्यात नागझरी, लोणी व डोंगरगाव येथील ३ मध्यम प्रकल्प, सिरपूर व मांडवी येथील २ बृहत लघु तलाव, इतर १३ लघु तलाव व ३ साठवण तलाव आहेत. तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान पूर्वी १ हजार २४० मी.मी. होते. हवामान विभागाने तालुक्यातील बऱ्याच वर्षांच्या वार्षिक पर्जन्यमानाचा अभ्यास करून, सन २०२० पासून तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान १ हजार ६३.०९ मी.मी. एवढे निश्चित केले आहे. राज्य शासनाच्या पर्जन्यमानाच्या पोर्टलवरील नोंदीनुसार गेल्या पावसाळ्यात दि. १ जून ते ३१ ऑक्टोबरदरम्यान पडणारा सरासरी पाऊस १ हजार ०२६.५८ मी.मी. आहे. याच



कालावधीत किनवट तालुक्यात प्रत्यक्षात पडलेला सरासरी पाऊस ११८५.६० मि.मी. आहे. जो की उपरोल्लेखित पर्जन्यमानाच्या ११५.४९ टक्के आहे. एवढा मुबलक पाऊस झाल्यामुळेच, आजपर्यंत एकाही प्रकल्पातील पाणी ज्योत्याखाली गेलेले नसून, यंदा रब्बी हंगामातील पिकांना या प्रकल्पांतील पाण्यामुळे बराच दिलासा मिळालेला आहे. आजमितीस ज्या मध्यम, बृहत व लघू प्रकल्पासह साठवण तलावात प्रत्यक्ष उपयुक्त जलसाठा आहे, त्याची आकडेवारी दशलक्ष घनमीटरमध्ये पुढील प्रमाणे कंसातील आकडे त्याची टक्केवारी दर्शवितात. नागझरी मध्यम प्रकल्प ३.१२२ (४७.५६), लोणी मध्यम प्रकल्प ४.७२६ (५६.३८), डोंगरगाव मध्यम प्रकल्प ४.९० (५५.७५), सिरपूर बृहत प्रकल्प ०.७५३ (२८.०२), मांडवी बृहत प्रकल्प– १.३६६ (३६.५७), लघु प्रकल्प : कुपटी ०.२७० (२०.८२), मूळझरा ०.७१३ (३९.३१), थारा ०.५५१ (६३.८१), निचपूर १.३१० (५९.२४), जलधारा १.०६८ (५७.२०), सिदगी ०.७२० (८४.८८) हुडी ०.७८५ (५०.१६), पिंपळगाव (कि.) १.२२५ (५६.५३), नंदगाव ०.४५९ (३१.४०), अंबाडी ०.२६६ (३२.७१), दरसांगवी १.४३६ (५३.४४), पिंपळगाव (भि.).२२१ (५३.५४), सावरगाव ०.५६४ (४३.०४), निराळा सा.त. २.५३३ (६७.७७), सिदगी सा.त.१.१३६ (४९.०९), लक्कडकोट सा.त. २.३०७ (७२.०५). उपरोक्त प्रकल्पापैकी मांडवी प्रकल्पातील सदोष वितरण व्यवस्थेमुळे प्रकल्पाचे पाणी कॅनालद्वारे शेवटच्या शेतापर्यंत पोहचत नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी त्याबाबत मंत्रालयापर्यंत तक्रारी केल्या आहेत. तेथून समस्येच्या निराकरणाबाबत पत्र येऊनही, तो प्रश्न अजूनही मार्गी लागलेला नसल्याचे एका शेतकऱ्याने सांगितले. तसेच सिरपूर व कुपटी लघु प्रकल्पांमध्ये तांत्रिक दोष असल्यामुळे तेथील साठा २० टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे. परिणामी उन्हाळी हंगामात तेथे पाणी टंचाई जाणवू शकते. खरीप व रब्बी हंगामातील सिंचनासाठी लघुप्रकल्पातील पाणी वापरल्या जाते तर मध्यम प्रकल्पातील पाणी खरीप, रब्बी व उन्हाळी अशा तिन्ही हंगामातील पिकांसाठी पुरविल्या जाते. निराळा, लक्कडकोट व सिंदगी येथील साठवण तलावामुळे भूगर्भातील पाणीपातळीत वाढ होण्यास मदत होते व त्यातील पाणी जनावरांना पिण्यासाठी व नागरिकांना वापरण्यासाठी राखून ठेवल्या जाते. या सोबतच किनवट शहराला नळयोजनेद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी नागझरी तलावातील १.५ द.ल.घ.मी. पाणी उन्हाळ्यात राखून ठेवले जाते.

## भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांकडून स्वागत



लातूर दि.०५-०४-२०२४ भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे लातूर दौर्यावर आले असताना भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरातचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांच्या औसा रोड भागातील देवघर निवासस्थानी भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.यावेळी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण तथा बंदरे मंत्री संजयजी बनसोडे, चाकूर-अहमदपूर विधानसभा मतदार संघाचे आ.बाबासाहेब पाटील,लातूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा तथा लिनेस क्लबच्या माजी प्रांतपाल सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, युवा नेते शैलेश पाटील चाकूरकर, अर्चनाताई शैलेश पाटील चाकूरकर, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, रासपचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब करपे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी लातूर लोकसभेच्या निवडणूक व प्रचाराबाबत सविस्तर चर्चा केली.

## लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये राजकीय पक्ष प्रतिनिधींना विविध बाबींविषयी मार्गदर्शन

### भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन करण्याचे आवाहन



लातूर, दि. ०५ : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्ष, उमेदवारांनी पालन करावयाचे नियमांसह इतर आवश्यक बाबींची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणीकृत राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, निवडणूक खर्च नोंदी यासह इतर महत्वाच्या बाबींविषयी यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे आणि संगीता टकले, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे, लातूरच्य उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज असून राजकीय पक्ष, उमेदवार यांनीही भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. नामनिर्देशन पत्रे भरण्यापासून प्रचार विषयक नियम, निवडणूक खर्च सादर करण्याबाबतचे नियम आदी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. भारत निवडणूक आयोगामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांचे आणि आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी राजकीय पक्षांच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश, नियमावलीबाबत मार्गदर्शन केले. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नेटके यांनी कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पालन करावयाच्या नियमांची माहिती दिली. उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे यांनी नामनिर्देशन पत्रे सादर करताना त्यासोबत द्यावयाची प्रमाणपत्रे, शपथपत्रे यासह इतर अनुषंगिक बाबींविषयी मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांनी टपाल मतपत्रिकाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा निवडणूक खर्च संनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी अप्पासाहेब चाटे यांनी उमेदवारांनी निवडणूक खर्चाविषयी ठेवण्याच्या नोंदी आणि त्याबाबतच्या नियमांविषयी माहिती दिली.

## एसबीआयने लाटले सरकारकडून करोडोंचे कमिशन

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसापूर्वी स्टेट बँक ऑफ इंडियाने राजकीय पक्षांना इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून मिळालेल्या देणग्यांची माहिती उघड केली. यात अनेक राजकीय पक्षांना हजारो कोटी रुपयांची देणगी मिळाल्याची माहिती समोर आली. इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून स्टेट बँक ऑफ इंडियालाही मोठा फायदा झाला आहे, बँकेला कोट्यवधी रुपये कमिशन स्वरुपात मिळाल्याची माहिती आरटीआयमधून समोर आली आहे. २०१८ ते २०२४ पर्यंत निवडणूक रोख्यांची विक्री सुमारे ३० टप्प्यांत पूर्ण झाली. या टप्प्यांमध्ये एसबीआयने विविध शुल्क आकारले आणि केंद्रीय वित्त मंत्रालयाला कमिशन म्हणून १०.६८ कोटी रुपयांचे बिल सादर केल्याचे समोर आले आहे.इंडियन एक्सप्रेसने आरटीआयद्वारे मिळवलेल्या माहितीवरुन ही माहिती उघड झाली आहे. एसबीआयने आकारलेले शुल्क वेगवेगळ्या किंमतींचे होते. सर्वात कमी शुल्क १.८२ लाख रुपये होते. सर्वाधिक शुल्क १.२५ कोटी रुपये होते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी एकूण ४,६०७ इलेक्टोरल बाँड्स विकले, तेव्हा ९ व्या टप्प्यात ही फी लागू करण्यात आली. बँकेने शुल्क वसूल करण्यासाठी सतत वित्त मंत्रालयात पाठपुरावा केला. यासाठी फेब्रुवारी २०१९ मध्ये, तत्कालीन एसबीआयचे चेअरमन रजनीश कुमार यांनी आर्थिक व्यवहार सचिव एस सी गर्ग यांना पत्रही लिहिले होते. त्यावेळी एसबीआयला अर्थ मंत्रालयाकडून ७७.४३ लाख रुपये वसूल करायचे होते. या पत्रात एसबीआयच्या अध्यक्षांनी हे कमिशन कसे ठरवले जात आहे हेही सांगितले होते. या अंतर्गत प्रत्यक्ष संकलनावर प्रति व्यवहार ५० रुपये आणि ऑनलाइन संकलनावर प्रति व्यवहार १२ रुपये असे सांगण्यात आले. अध्यक्षांनी प्रति १०० रुपयांवर ५.५ रुपये कमिशन सांगितले होते. कमिशनवर १८ टक्के जीएसटी कमिशनवर १८ टक्के जीएसटी द्यावा, असे एसबीआयकडून सांगण्यात आले होते, तर बँकेने जीएसटीवर २ टक्के टीडीएस लावण्याची तक्रार मंत्रालयाकडे केली होती. ११ जून २०२० रोजी पाठवलेल्या ईमेलमध्ये, एसबीआयने ३.१२ कोटी रुपयांच्या कमिशन पेमेंटमध्ये कापून घेतलेले ६.९५ लाख रुपये परत करण्याची मागणी केली होती.कोर्टाच्या आदेशानंतर बाँड्सची माहिती सार्वजनिक यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारची इलेक्टोरल बाँड योजना घटनाबा ठरवत रद्द केली होती. न्यायालयाने एसबीआय'ला इलेक्टोरल बाँडशी संबंधित माहिती निवडणूक आयोगाकडे देण्याचे आदेश दिले होते आणि निवडणूक आयोगाने ही माहिती आपल्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी असे सांगितले होते.युनिक नंबर्सची माहितीही दिली या आदेशानंतर एसबीआयने माहिती देण्यासाठी १८ जूनपर्यंत वेळ मागितला होता. मात्र, ही माहिती तातडीने द्यावी लागेल, असे न्यायालयाने एसबीआयला सांगितले होते. यानंतर एसबीआयने निवडणूक आयोगाला ही माहिती दिली होती.

## माझं घर प्रकल्प,बुधडा येथील विद्यार्थ्यांची मोफत सर्व रोग निदान शिबिर संपन्न

लातूर :- माझं घर प्रकल्प,बुधडा,ता.औसा येथे कमला गर्ल्स होस्टेल,लातूर, तिरूमला क्लासेस,लातूर व कर्मयोगी ड.देविदास राव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूर यांच्या वतीने मोफत सर्व रोग निदान शिबिर व रक्तगट तपासणी शिबिर घेण्यात आले. याचे उद्घाटन श्री बालाप्रसाद किसवे, प्रदेश अध्यक्ष शिवसेना (शिंदे गट) व्ही. जे. एन. टी. यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रकल्प संचालक शरद झरे, सौ. झरे वहिनी, कमला गर्ल्स हॉस्टेल चे संचालक गोविंद कुंचमवार,तिरुमला क्लासेस चे संचालक दत्तात्रय गायकवाड, कर्मयोगी कै. ड. देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे



कवी डॉ. संजय जमदाडे ,विक्रमवीर रक्तदाते पारसेठ चापसी, कमलाकर दाणे शिवसेना प्रमुख धाराशिव( शिंदे गट) व्हि.जे.एन.टी., व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. श्रीराम कोळेकर यांनी सर्व प्रकल्पातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली तर तिरूमला क्लासेसच्या स्टाफने रक्तगट तपासणी केली. यावेळी बालाप्रसाद किसवे यांनी समायोजित भाषण केले तर डॉ. श्रीराम कोळेकर यांनी आरोग्य विषयक कशी काळजी घ्यावी याचे विवेचन केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी तिरूमला क्लासेस स्टाफ, डॉ. श्रीराम कोळेकर, कमला गर्ल्स हॉस्टेल व प्रकल्पातील स्टाफने प्रयत्न केले.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे 'नॅक मूल्यांकन' अंतर्गत एनर्जी ऑडिट संपन्न

लातूर (प्रतिनिधी) दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे 'नॅक मूल्यांकन' अंतर्गत ऊर्जा लेखापरीक्षण करून दि ५ एप्रिल रोजी अहवाल सादर करण्यात आले. एनर्जी ऑडिट इमारतीमध्ये वापरात असलेल्या ऊर्जेच्या नुकसानाच्या जोखमीचे मूल्यांकन करतात. ऊर्जेचे प्रबंधन करून २५ % बचत व्हावी या उद्देशाने प्रभारी प्राचार्य डॉ. आर.एस. पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'नॅक मूल्यांकन' अंतर्गत पर्यावरण आराखड्याची बैठक आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी महाऊर्जा महाराष्ट्र शासन एम्पानेलड ऊर्जा लेखापरीक्षक केदार खमितकर, आईक्यूएसी समन्वयक



डॉ.बालाजी सर, डॉ.मनीषा मॅडम यांची प्रमुख उपस्थित होती. शाश्वत विकासाच्या अंतर्गत ऊर्जा संवर्धन धोरण दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आज जाहीर केले. ऊर्जा-कार्यक्षम इमारती कमीत कमी ऊर्जा वापरतात. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने व्यावसायिक इमारतींचे स्टार रेटिंग २००९ मध्ये भारतात लाँच केला आहे. जो इमारतीमधील ऊर्जा वापरावर आधारित आहे. या प्रोग्राममध्ये, इमारतींना १ ते ५ स्केलवर रेट केले जाते, ज्यामध्ये ५-स्टार लेबल असलेल्या इमारती सर्वात कार्यक्षम आहेत. वित्तीय वर्ष २०२४ साठी वाणिज्य इमारतीत ऊर्जेचा कार्यक्षम वापर आणि बचतीचे लक्ष्य पॉलिसी मध्ये देण्यात आले आहेत असे सांगण्यात आले.

## सायकल चालवा निरोगी रहा – अभिजीत देशपांडे सरसंबेकर

लातूर / हल्लीच्या धावपळीच्या काळात प्रत्येकास आपल्या प्रकृतीकडे लक्ष देणे होत नाही, त्यामुळे शक्य तितके सायकल वापरा, त्यातून प्रदूषण आणि प्रकृती दोन्ही साध्य करता येईल असे प्रतिपादन लातूर सायकलिस्टचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष अभिजीत देशपांडे यांनी केले.जिल्हा सायकलीस्ट क्लबच्या संचालक मंडळाच्या कार्यकारिणी निवडीसाठी शहरातील हॉटेल वृंदा याठिकाणी बैठक झाली यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी ते पुढे म्हणाले की कामाच्या वेळामुळे प्रत्येकास व्यायाम शक्य होत नाही, अशा वेळी दैनंदिन व्यवहारासाठी आपण सायकल वापरू शकतो, हीच जनजागृती आपण



सायकलिस्ट क्लब च्या वतीने लातुरात करणार आहोत, जास्तीत जास्त लोकांनी सायकलचा वापर करावा यातून शहरातील प्रदूषण आणि शहरावासियांचे स्वास्थ व्यवस्थित ठेवण्यास मदत होईल असे मत यावेळी सरसंबेकर यांनी व्यक्त केले.लातूर शहरात ही मोहिम वाढविण्यासाठी सन २०२४-२५ या वर्षाकरीता कार्यकारिणी निवड करण्यात आली. त्यात अध्यक्ष म्हणून अमृत मेळकुंदे, उपाध्यक्ष अभिजीत देशपांडे सरसंबेकर सचिवपदी गणेश हाके, सहसचिव शाम शेटे यांची निवड करण्यात आली आहे.

उर्वरित कार्यकारिणीमध्ये इतर पदाधिकारी निवडण्यात आले आहेत. यावेळी लातूर सायकलिस्ट क्लबचे सदस्य यांच्यासह शहरातील सायकलस्वार मोठया संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE